11 NOV 2022 क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रयत शिक्षण संस्थेचे विद्यापीठ व्हावे: कुलगुरू



रयत शिक्षण संस्थेचे विदयापीठ व्हावे, असे स्वप्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पाहिले होते, ते आज सत्यात उतरले आहे आणि या विद्या पीठाचा प्रथम कुलगुरू होण्याचा बहुमान मला लाभला, याचा आनंद मोठा आहे. एक रयत सेवक म्हणून या विद्यापीठाची उभारणी करण्यासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्या पीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काल येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाने कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्या पीठाची स्थापना केली असून या विद्यापीठाच्या प्रथम कुल गुरुपदी शिवाजी विदयापीठाचे कुलगुरु डॉ. शिर्के यांची निवड केली आहे. त्यांनी काल पदाचा कार्यभार स्वीकारला. त्या निमित्ताने सातारा येथील यशवंत राव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या स्वागताचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील अध्यक्ष स्थानी होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील विदयापीठ आकारास आले आहे, त्यामागे अनेकांचे योगदान आहे. मात्र आता आपली जबाबदारी वाढली आहे. विद्या पीठ नावारुपास आणण्यासाठी सर्वांना पूर्ण क्षमतेने योगदान दयावे लागणार आहे. नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणारे काळानुरुप आवश्यक ते अभ्यास क्रम या विदयापीठामार्फत सुरु करण्यात येतील, असेही त्यांनी सूतोवाच केले.

अध्यक्षीय भाषणात रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी संस्थे बद्दलची माहिती दिली. कुलगुरु डॉ. शिर्के यांचे स्वागत त्यांच्या हस्ते करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. व्ही. एस. शिवणकर यांनी प्रास्ता विक केले. डॉ. जे. जे चव्हाण यांनी आभार मानले. डॉ. मनि षा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सदर कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव (उच्च शिक्षण) डॉ. शिवलिंग मेनकुदळे, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, साताराचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, साताराचे प्राचार्य डॉ.बी.ए.कांबळे यांच्या सह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. दरम्यान, कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाचा पदभार स्वि कारल्यानंतर डॉ. विजय कुंभार यांची कुलसचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

सकाळ

# अवतीभवती

## संख्याशास्त्र अधिविभागातर्फे उद्या परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (ता. १२) 'नॉन पॅरामेट्रिक स्टॅटिस्टिकल मेथड्स' विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद होत आहे. राजर्षी शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले आहे. संख्याशास्त्र, विद्यार्थी, संशोधक, तज्ज्ञ, प्राध्यापक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन चर्चासत्राचे समन्वयक डॉ. एस. डी. पवार व अधिविभाग प्रमुख डॉ. एस. बी. महाडिक यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ संख्याशास्त्र अधिविभागामार्फत उद्या परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागामध्ये शनिवार (दि. १२) रोजी 'नॉन पॅरामेट्रिक स्टॅटिस्टिकल मेथडस्' विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे.

परिसंवादामध्ये व्याख्यान देण्यासाठी मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटी, अमेरिका येथील प्रा. प्रकाश पाटील, निम्स विद्यापीठ मुंबई येथील प्रा.के.एस. माधवराव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील प्रा. टी. वी. रामनाथन यांना निमंत्रित केले आहे.

परिसंवादास उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन चर्चासत्राचे समन्वयक डॉ. एस.डी. पवार, अधिविभप्रिमुख डॉ. एस.बी. महाडिक यांनी केले आहे.

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठ सिनेट निवडणुकीची तयारी पूर्ण

## कार्यक्षेत्रात ३३ मतदान केंद्रे; पदवीधरला ३६ हजार तर शिक्षकसाठी ६४० मतदार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी सोमवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ३३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. पदवीधरसाठी ३६३४३ तर शिक्षकांसाठी ६४० मतदार असणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाकडून मतदानाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे.

विद्यापीठ प्रशासनाने मतदार केंद्रांची नावे व तेथे होणारे मतदान यांची यादी निवडणूक विभागाने प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे सर्वच संघटना, आघाड्या संबंधित मतदान केंद्र परिसरातील मतदारांची जुळवाजुळव गुंतल्या आहेत. यंदा पदवीधर मतदारांची संख्या जास्त असल्याने मतदान केंद्रात वाढ झाली आहे. विद्यापीठ निवडणूकीची रणधुमाळी सुरू आहे. सध्या आघाड्यांकडून प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. सोशल मीडियासह व्यक्तिगत भेटीगाठी घेऊन मतदान करण्याचे आवाहन उमेदवारांकडून केले जात आहे.



विद्यापीठ विकास आघाडी शिक्षक, विद्या परिषद, पदवीधरच्या जागा लढवित आहे. अधिसभा शिक्षक मतदार संघासाठी खुल्या प्रवर्गातून डॉ. रघुनाथ ढमकले (कोल्हापूर), डॉ. अनिल कुराडे (गडहिंग्लज, कोल्हापूर), डॉ. सचिन पवार (पेठवडगाव, कोल्हापूर), डॉ. सागर व्हनाळकर (गारगोटी), डॉ. प्रशांत खरात (सांगली) तर अनुसूचित जाती प्रवर्गातून डॉ. संतोष खडसे (इस्लामपूर, सांगली), भटक्या, विमुक्त जाती-जमाती प्रवर्गातून डॉ. राजेंद्र लवटे (जत, सांगली) व इतर मागास प्रवर्गातून डॉ. देवआनंद सोनटक्के (कोरेगाव, सातारा) हे निवडणूक रिंगणात आहेत.

नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाच्या खुल्या प्रवर्गातून अमित जाधव (कराड, सातारा), विष्णू खाडे (कागल, कोल्हापूर), पंकज मेहता (इचलकरंजी, कोल्हापूर), स्वागत परूळेकर (कोल्हापूर), अजित पाटील (कोल्हापूर) तर अनुसूचित जाती प्रवर्गातून रतन कांबळे (शिंगणापूर, करवीर), भटक्या, विमुक्त जाती-जमाती प्रवर्गातून अमरसिंह रजपूत (कागल, कोल्हापूर), इतर मागास प्रवर्गातून अभिषेक मिठारी (कोल्हापूर) हे निवडणूक लढवित आहेत. विद्या परिषदेसाठी खुल्या प्रवर्गातून डॉ. संतोष जोशी (सांगली), डॉ. नागनाथ मासाळ (गडहिंग्लज, कोल्हापूर), डॉ. शोभा काळेबाग (कोल्हापूर), अनुसूचित जाती प्रवर्ग डॉ. दिलीपकुमार कसबे (कराड, सातारा) हे निवडणुकीत उभे आहेत. भटक्या विमुक्त जाती-जमाती प्रवर्गातून डॉ. जगदीश सपकाळे व महिला प्रवर्गातून डॉ. वर्षा मैंदर्गी बिनविरोध झाल्या आहेत.

अधिसभा (सिनेट) 'सुटा' पुरस्कृत उमेदवार खुला प्रवर्गातून डॉ. डी.एन.पाटील (बिद्री, कोल्हापूर), डॉ. उमाजी पाटील (हलकर्णी, कोल्हापूर), डॉ. रमेश पाटील (इस्लामपूर, सांगली), डॉ. निवासराव वरेकर (विटा, सांगली), डॉ. मनोज गुजर (देऊर) तर आरक्षित जागेसाठी डॉ. बबन सातपुते (मिरज), डॉ. शिवाजी बोथीकर (कोल्हापूर- बिनविरोध), डॉ. ज्ञानदेव काळे (मेढा), डॉ. प्रकाश कुंभार (तिसंगी), प्रा.शाहीन पटेल (वाघोली- बिनविरोध) झाले आहेत. विद्या परिषद (सुटा पुरस्कृत) जागेसाठी डॉ. राजेश निमट (पाटण), डॉ. पोपट पाटील (पलूस), डॉ. सुनील बनसोडे (जयसिंगपूर), डॉ. सुनील चव्हाण (कुरुंदवाड) निवडणुकीत नशीब आजमावत आहेत.

शिव-शाहू आघाडीच्या माध्यमातून पदवीधरच्या जागा लढविल्या जात आहेत. यात खुला गटातून नितीन भिलारे (सातारा), अक्षय दांगट (कोल्हापूर), अभिजित खोत (कोल्हापूर), शिवराम मिस्त्री (सातारा), श्वेता परूळेकर (कोल्हापूर) तर एनटी प्रवर्गातून राजेश वरक (कोल्हापूर), ओबीसी प्रवर्गातून जमीर मुल्ला (कोल्हापूर), एससी प्रवर्गातून मंगेश कांबळे (कोल्हापूर) निवडणुकीत उभे आहेत.

पुढारी

# 'दूरशिक्षण' अभ्यासक्रम प्रवेशासाठी १५ पर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची बी.ए., बी.कॉम, एम.ए. एम.कॉम, एम.एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि.१५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे. शिवायमहाविद्यालयास तुकडी मान्यता न मिळाल्याने व महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकताच बारावी रिपीटरच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केला आहे. अशा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यासकेंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे.

11 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



मॉरिशिस मराठी सांस्कृतिक केंद्रीय संस्था व शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या मराठी विभाग व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने मराठी लोककला आणि लोकनृत्यावर आधारित कार्यक्रम येथील शहाजी कॉलेजच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झाला. मॉरिशिस देशातील तेरा कलाकारांनी गुरुवारी टाळ व लेझीमच्या तालावर नृत्याविष्कार सादर केला. (छाया : नसीर अत्तार)